म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २३५६

# नितान्त

वा. रा. सोनार



REFBK-0022363
REFBK-0022363

२२३६३
संदर्भ
काव्य २३५६

# नितान्त

वा. रा. सोनार

REFBK-0022363
REFBK-0022363

चेतश्री प्रकाशन, अमळनेर

© सौ. यशोदा सोनार

मुद्रक : नाना डेंगळे, साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार पेठ, ४११०३० पुणे

प्रकाशक : सौ. यशोदा सोनार, चेतश्री प्रकाशन, देशमुख चाळ, अमळनेर

मुख/मलपृष्ठ : सुभाष अवचट आत सजावट : मधू पाटील

प्रथम आवृत्ती : ८ फेब्रुवारी १९७६

किंमत ७ रुपये

........But for you the world is chaos to me.

— Othello.



ही कविता तशी नित्यासाठी, आत्महत्या करणाऱ्या सर्व कलावंताना

२२३६३
काव्य
२३५६

*

बरसातीनंतर उजळलेली अर्धरात...
मेघमुक्त आभाळाखाली चांदण्याची
झूल पांघरून वेडी पुळण...
पाऱ्याची तहान ल्यालेले झाडाचे पान न् पान...
चंद्रमेण्यातून ओघळणारी पानापानांवरून टपटप धार
आणि या सुखधारेत भिजलेले
भिजतांना नुरलेले
शिल्प तुझे-माझे प्रकाश पारखे

हे चित्र फिनिक्स पक्ष्याच्या चोचीत
अलगद नेऊन ठेव.
अनंत मरणांच्या वाटचालीवर
आपण आत्ताच कुठे पहिले पाऊल रोवले आहे.

※

एक वेटिंगरूम असतो
अंधार-पर्व गुहा
मी असतो दाराशी, अनिवार्य
युगे पायाखालून गेल्यासारखा असहाय.

हमदर्दी चेहऱ्यासाठी रोज डोळ्यात बाळगतो
प्राणोत्सुक आत्महत्या.
मी जणू अटळ, मृत्युपारखा.

एक झाड असते गुल्मोहोराचे
वठलेले, माझ्या जन्माआधी.
माझ्या शिरावर, तसे मला अनादि.
मेंदीच्या पावलांचे कळप जातात जवळून
अजून एकही पाऊल गुल्मोहोराच्या ऊरातून कसे फुटत नाही?
माझ्याही शापांना पालवी का धरत नाही?

एक असतो रंगमंच
स्वगतांच्या रानात पार झाकलेला.
स्वगते वेऱ्यांसारखी टापा घालीत भरधाव धावतात,
विजनातून मनापर्यंत.
आता तर रंगही ओघळू लागलेले
फक्त तुझे भास प्रवेशतात, पुनः पुन्हा पडदा पडेपर्यंत.

एक स्मशान असते
एक मी असतो
माझ्या ओंजळीत ओल्या तुझ्या प्रतीक्षा
ज्वालाग्राही, ही चुकामूक जन्मवैरी शिक्षा.

या समोरच्या वणव्याला
आता आपण सामोरा जाऊ या.
आपल्या पायांखालच्या वाटांचा कापूर घालू या.
गोष्टी तुझ्या-माझ्यातल्या अशा
फुलांतून पानोपानी गेल्या
गोष्टी तुझ्या-माझ्यातल्या
आता तुझ्या-माझ्या न राहिल्या.

✻

खाली मान घातलेल्या
तिघा भुतांना विचारले,
' तुम्ही कोण ? '
तिघांच्या पावलातून तो सावकाश उमलत
आला, म्हणाला,
तुझ्या अस्तित्वाला वेढून असलेले काळाचे त्रिदल.
आणि माझ्या मुठीत अकाल तडफडत तुम्ही दोघे.
मी ?— गझल. '

✻

✲

हल्ली हल्ली मी जगतोय
एक अरण्यवासी प्रदीर्घ कविता.
हे पाणी इतुके व्याकुळ
हृदयांच्या झऱ्यातून झरता.
खोल खोल बुडत जातोय.

पिळल्या वाद्यातून जसा की दुःख स्वर.
कोसळेल का कधी विळखा घातलेले
प्रार्थनांचे अगतिक शहर ?

वणव्यातून बाहेर पडणाऱ्या पक्ष्याला द्यावे डाळिंबाचे दाणे
तसे तुझ्या मुठीतले माझ्यासाठी कोमल क्षण.
खूर ऊरावर घेऊन धुळीच्या जंगलात करावा गुन्हा
दिशा बदलून योद्ध्याने
तसे तुझ्या हाकेपल्याड पसरलेले माझे मरण.

काचापाण्याच्या प्रदेशातल्या परीसारखी माझी मत्रीण
अजून डोळ्यांवर पांखरे, न्हालेली नीज
देहावर ज्योत घेऊन निघालो ढगातून
सवय होता होता झेलीनही अंगावर वीज.

तुझ्या पावलांसवे सरकणाऱ्या उन्हासारखी
कविता भेटेपर्यंत हे शहर पालथे घालू.
समजा शहर संपले तर
ग्रेव्हयार्डची झुडपे तरी नाकारणार नाहीत ना ?
अंतर थोडे राहिले, सये, पावले उचलू.

✲

*

खोल खोल ओळखीचे कुणी भेटले तर
अनोळखी प्रदेशाची तहान का लागते ?
पत्रातले शब्द खोडले की ते आणखी
पारदर्शी कसे होतात ?

वाटातून डोळे रुतत जावेत हे ठीक, पण
काळीजे आठवणीत जमा झाल्यासारखे खोल खोल का जावे ?
आवडत्या माणसाचा चेहरा
प्रार्थनेहून वेगळा का वाटू नये ?

गर्दीत डोळ्यातलं पाणी कस लपवायचं असतं ?
गझलांचा पीळ आताशा माझ्या आतड्यांना का सहन होत नाही ?
नक्षत्रातून झरणारा हा एकांत लवकरच बुडणाऱ्या
बेटासारखा का सोबत करतोय ?

आता प्रत्येक क्षणावर तुझे गोंदण सहन होत नाही;
डोळ्यांत प्राण तरी कुठून आणू ?
ही गीते फिरून फिरून
माझ्या अंगणात येणार आहेत.

ध्रुपदासाठी तुझ्या पावलांना सांगून ठेवशील ना ?
या रात्रींना आपली गाणी कळतच गेली
आता त्या जागत बसतील दिवस-दिवस, त्याचे काय ?

कफल्लक आयुष्यावर कडाडणारे ऊन
फक्त तुझ्या कंठातल्या हाकांशी का मावळतं ?

मी वाळूत घरे बांधतो, तू स्वप्ने वेचून आणतेस ?
डाव उधळतांना हात तरी रिते नकोत, नाही का ?
या घराच्या ओठावरून आपले निर्वाणीचे बोट अलगद ठेव.
आपोआप शिलगते मौन, काळजावर फडफडणाऱ्या,
आकांती पंखांसारखे सहन करशील ?

माझ्या पालणाला अपुरी पडणारी ही घरे, या वस्त्या,
ही उद्याने, ही नगरे, हे पहाड, या वाटा
कशी माझ्यावरच उलटून आली आहेत.
सावरण्यासाठी चिमुकला हात काळजावर टेवशील ?
उलथा-पालथीच्या संध्याकाळी नक्षत्रांचा थवा घेऊन आलीस,
म्हणून तरी बरे,
हुंदक्यांसारखे दाट ढग पदराखाली घेतेस ?

*

पाकळ्यांसारखे माझ्या सावलीचे
वखुरलेले तुकडे तुकडे...
विषण्ण नदीकाठ

माझ्यातून अपाप फुटणाऱ्या गझलांचे
निर्मोही केशर

संध्याकाल होतांना हे सगळे मावळत जाणार,
माझ्यासकट, तू अजून उगवशील
अशी वाट पहात.

स्वप्नांनो, आज जरा लवकर या,
कदाचित ती तुमच्यातूनही येईल.

*

※

हा भिंतीत चिणून ठेवलेला डीप-फ्रीज
शेजारी देवघर होतं म्हणतात याच्या
शोधलं तर सापडेलही इथेच कुठेतरी
हा अवेळी उघडला की निघतात यातून
बर्फांच्या वाफा.... थंडगार अंगार.

आतल्या खणात,
माणसांच्या जंगलात कधी धुक्याचा जीवाभावाचा
आधार ती.
काठाशी दर्शनी उपचार,

डोईवर तिच्या राक्षसी घडा
पावले शाबूत घट्ट तिची इतकी
पुढे कंटाळून हताश वाटाच फाटल्या.

शत्रूसारखे मस्तकात भिनते आहे
हे थंडगार यंत्र. करते प्राणघातक हल्ला.
म्हणत असतो, त्याआधीच देणार आहे
मूठमाती स्वतःला.

पण माझ्या बाहुतले पोलाद असे कुणी पोखरले ?
थंडगार देहावर अचानक दिशांचे सर्पण कसे झाले ?
या सोलीव आठवणींचे पक्षी
कलदार कलावंताच्या तटस्थपणाने
फ्रीझ सोडून पळताहेत माझ्या यात्रेला.

अशावेळी मी पळणार तरी कुठे ?
सगळ्या दिशाही आता फ्रीझ होताहेत. डीप-फ्रीझ.

*

ती ओळखू येईल अशी काहीच चिन्हे नव्हती.
सुकलेले ओठ... वाळलेले शब्द
खळलेलं पाणी... जळलेल्या वाती.
तिला ओळखलं इतक्या गर्दीतही
केवळ कुंकवाशेजारच्या जखमेशी अडणाऱ्या पदरावरून
अशावेळी तिचा हात तिथेच थबकतो सवईनं.
भळभळता पंख दाबून धरावा तशी.
अशावेळी व्हायचे तिचे डोळे
अनर्थांच्या मीनारावरून कोसळते दोन पक्षी.
जिवंत उमाळे, पार्थिव रागालोभाचे
पाण्याची मासोळी चुबकावी कळशीत
असे तुडुंब एकाकीपणाचे.
त्याच्या पावलांसाठी उंबरा होणारे
समुद्र नसलेल्या गावांना भिजवणारे
वणवा नसलेली राने पेटवणारे
आकांतांच्या लकेरींवर पाखरांचे जहर फेकणारे
डोळ्यातच खोल रुपत जाणारे
दुखःवासी डोळे.

*

आता केव्हाही सांज मिटू लागली की
तिचे डोळे वाहू लागतात
माझ्या डोळ्यांना न जुमानता
ते मनाची भाषा ऐकतात
लाल काळोखाची
ओली गाणी मागू लागतात.

*

✻

तो मला पुनःपुन्हा भेटत राहिला
एकदा घरापासून तुटलो
अनोळखी माणसांच्या गर्दीत तेव्हा
इतके कोवळे आयुष्य होते कधी कधी
निराधारांचे श्वासहि पावलात भरतात जेव्हा

संध्याकाळी एकाकी फलाटावर उतरणारा मुसाफिर
काळजावरून जाणारी सुन्न धडधडती गाडी
आत्महत्येपूर्वी आवळून घ्यावा गळा अशी शीळ तेव्हाची
एकाद्याच ज्योतीने फाडलेला अंधार ओल्या जखमेसारखा
माझा अंदाज किती खरा
बाहेर तिष्ठत माझ्यासाठी गाडीवान युगपारखा

बाजूच्या शेतात अंकुरलेल्या गाण्यांचे तुकडे
उद्ध्वस्त उत्सुक स्मशान बेदर्दी
हिनकळणारा कंदील मरणवाऱ्यासारखा
अंगावरून कोण पुटपुटते माझ्यातून,
'मेरे पास वक्त नहीं है भाई
जरा जल्दी चलो...जल्दी.'

✻

विळयाला आलेले तुझे
कृष्ण-कमळीचे फूल
कानामागून झालेली माझी
एक जहरी जन्म-भूल.

✻

*

ही आमची नेहमीची बाग
त्या मुक्या बदामाच्या झाडाखाली निश्चेष्ट बाक
सायंकाळ झेलून हृदय पांधरणारा अनिमिष गुल्मोहर
थकून निजू आलेली पायाखाली वाळू नेहमीची
वाकून आलेली सोनचाफ्याच्या तंद्रीतली नक्षत्रांची यात्रा
ती यायच्यावेळी आधी ही बदामाची पाने कुजबुजतात.
अंधाराचा हळुवार हात धूळ जागवतो
गुल्मोहरावर तिची पावले ऊरी फुटतात.
आता सावकाश मी डंखवून घेतो
पानांतून...फुलांतून...वाऱ्यांतून
तिच्यासाठी शेवटचा चाहूल-करी म्हणून !

*

तशी ती रोजच्यासारखी
संध्याकाळच्या बागेत आली एकटी.
वळणाऱ्या पानांवरून विखुरलेला शेवटचा सूर्य
पालाण आटोपल्यावर जोगिणीने
विश्रांतीच्या कमंडलूकडे पहावा, तसा पाहिला.
हळुहळू सरतीच्या प्रार्थनेसारखा
अंधार तिने केसातुन माळला.
अंधार धसू लागला तेव्हा
शालीवरचे टाके उसवायला सुरुवात केली.
मनाहून दूर होत...काळोखाहून काळी होत
एकेक टाका...उसवता उसवेना...रक्ताशिवाय.

*

*

केव्हा आधार वाटला तुला
तेव्हा या काळोखाच्या पालखीचा
अशा वेळी पांथस्थाच्या गळ्यातल्या
प्रकाश- तहानेकडे पहायचे नसते.
स्फोटाला इतकीही हळुवार तिरीप पुरे असते.
अशा या प्रलय-उजेडात
सोललेल्या देहांचे अ-कारण पाहवत नाही.

चल, आपापले कूस तरी पाठीशी घेऊ या.

*

ऋतू उलटून गेले तेव्हा
विनाशाची हाक थकत गेल्याचे ऐकले.
महानिद्रेचे सोंग उतरून झाले तेव्हा
ऋतू तेथेच होते, थांबलेले.
माझ्या कानाशी वाळलेल्या गवत-काड्यांसारख्या
हाका घट्ट बिलगून
संपूर्ण अविनाशी.

आणि आता ऋतू येतात आणि जातात.

✻

या प्रचंड आक्रोशांची हाक
गळ्यात घेऊन तुझ्यापर्यंत येईन तेव्हा
माझी रात्र संपलेली असेल.

धुक्यातून तुला शोधावे कसे ?
नांगरून ठेव किनाऱ्यावर फक्त पापण्यांची शीडे
धुके पांघरून चंद्र असूं दे परजन्मासारखा खुणेसाठी
या किनाऱ्यावरून निघतांना प्रार्थना जोडतोय
हाकेला, ' – फार तर या जन्माइतकीच रात्र असावी मोठी. '



✻

माझ्या कहाणीचा तुला सोस होता
हिर्व्या पानाला जपणाऱ्या कापुरासारखा
तुला जपत जळत राहिलो
जळतांना जुळवीत गेलो स्वत:ला कहाणीतून
तेव्हा पुन्हा उरी फुटलो.
तूही अशी की ऐकतच राहिलीस
माझी समजून, कहाणी तुझीच तू–पारखी.
पहातेस एकटक वणव्याकडे आता
तळहातावरल्या आदीम चिंगारीसारखी.

✻

त्याच्या गाण्यातली रक्तधून
ज्वालामुखीसारखी खदखदत
हिम-पावलांच्या घुंगुरांवर
तिचे रक्त अनाहत

दिशाभुलीच्या मुसाफिरालाच का रे
तुझ्या हातातला गजरा मिळतो ?
समाधिस्थ पहाडातल्या गीतांसाठी
शापांचे घाव असे कोण देतो ?

पावसाळी संध्येचा चेहरा तुझ्या दुःखासाठी
एकांतात हरवणे कसे जमते गझलांच्या काठी ?
इतके काहूर जन्मपीडेसारखे वाढवीत गेले तुला
उमाळ्यांच्या अरण्यात कसा तुडविला गेलास फुला !
वृक्षांच्या मोहोरातून उडणारे पक्षी, तुझे आठव
संदर्भहीन तू, नव्हतास आमचा, तरि हृदयीं कालव.

एकाकी वितळावा बर्फ गहिवरांचा असा वाहू लागलास.
मातीला नसते सवय प्रपातांची, कसा कडा कोसळलास.
क्षितिजभर पसरलेल्या वाळवंटावर
तुझ्या आणाभाकांचे करुण स्तंभ
धुळीत पाय, पायाशी मद्य, दूर
कुठे रक्तात रिघे शून्य प्रारंभ.
कुणा मृत्युंजयी लाटेच्या ओहोटीत सापडलेले जहाज
मान टाकून किनाऱ्याला
ऋतु- निरपेक्ष समुद्र-पक्षी गळ्यात हाकांसारखे
माझ्या बेघर आश्रयाला.
सूर हरवलेले गाणे किती करुण जसा की देवदास
आभाळाचे चंद्रहीन संगमरवर कसे मृत्यूहून उदास.
दिशाभुलीच्या मुसाफीरालाच का रे
तुझ्या हाताला गजरा मिळतो ?
थोडा थांब तर राखेवर
मीही प्रियेचा निरोप घेतो.

❋

*

किती करुण स्वत:तून तुटत तुटत जाणे
किती करुण केसातून हात गळून पडणे
किती करुण रडून सुजले डोळे ओलीस ठेवणे
किती करुण कवितेचं काजळ डोळा रेखणे
किती करुण कफनीत काळीज–धडधड धरणे
किती करुण एकांतात स्वत:ला शोधीत जाणे
किती करुण तुझ्याच गावात पुन:पुन्हा येणे
किती करुण गळयात चिणलेली तिची हाक
किती करुण हातावर जळती कापुरी आणभाक.

*

निरभ्र नभांगणातील सात ऋषींचे आसन
या माझ्या खिडकीत येऊन बसले आहे
झुळझुळणारा पडदा म्हणून.

आभाळातून धावणाऱ्या तीन बगळ्यांनी
या घराच्या भिंतींचा आडोसा घेतला आहे
आभाळ समजून.

नक्षीदार माड बनांच्या गवसणीतून
सागरगान बाळगणारी पुळण
कोपऱ्यात निश्चल उभी आहे
घरंदाज सतार म्हणून.

माझ्या या घरात तुझ्या स्वागतासाठी
आकाश गंगेचा गजरा हातात माळून.
फक्त आज वेगळया वाटेने येथवर ये
या घरावर निष्ठूर फणा आदळणारी
धुळीची वाट सोडून.

आणि हे सारे चित्र चांदण्याने भिजवून टाक
तळाशी चंद्र असलेले
नितळाईचे माप उलथून.

*

तू यायचास डोंगरापर्यंत तिच्याबरोबर
बघायचास सूर्यास्त तिच्या डोळ्यात
गतजन्माशी प्राण गहाण टाकल्यासारखे.
वाळलेल्या गवतावरून सळसळायचा
पदर तिचा अनामंत्रित दुःखासारखा

पाखरे उडण्याच्या प्रसंगी
का व्याकुळ व्हायचे तुझे डोळे?
कशी लाभायची काळीज-कळा तिच्या तळव्यांना
तुझ्या हातात, दिशांच्या पाळण्यात
निजावे जसे आभाळ निळे.
यातले तिला काहीच ठाऊकही नसावे.
उमजत नाही काही असेही काही असावे.

ऐकू येत नसावे वादळी चेहऱ्याचे मौन
वाचता येत नसावी बुडणारी संध्याकाळ
लागत नसावी गंगोत्री डोळ्यातल्या पाण्याची
फुटत नसावे गलबत समुद्र-मध्यात अकाल

आत्महत्येच्या दिवशी ती मैत्रिणींना म्हणाली
एवढेच, 'तो मला समजलाच नाही.'
अबोधच राहिला नित्य शब्दांच्या काठी'
इतकेच मात्र तिला आठवत गेले
ओठांवरून त्याने हलकेच आपुले कबुलीचे बोट
पिसासारखे फिरवले, खूप काही सांगण्यासाठी.
नंतर त्याने धावत जाऊन कडेलोट
करून घेतला,
हातावरच्या एका रेषेला जागून-
ती म्हणत असते, तिला काहीच समजले नाही
अगदी अजून.
तर असो......

*

✻

या अपरात्री रानातून चिमण्या उडाल्या
तिचा मेणा तर पलीकडून जात नाही ना ?

हा वेडा कंदिल उशाशी आता केवळ तिच्याचसाठी
ती येई तो वाचील बिचारा विझल्या भेटीसाठी

✻

अंधारल्या अंगणात तो येत राहिला
कळत-नकळत पुनःपुन्हा
पाचूंच्या जखमा अंगभर लेवून
जवळ जवळ प्राणऊणा

पापण्यांच्या ओंजळीतून प्रकाश प्राशीत राहिली
तेव्हा गर्दीकडे तिचे लक्ष नव्हते
केव्हातरी दिसू लागले पाझर-डोळयांनी तिला
एक जखमी गाणे पायाशी खुरडत आले होते.
गर्दीने तिचा हुंदका तिच्यासह टिपून घेतला
तिनेही सावरून मग स्वतःच घाव घातला.
गाण्याच्या सर्वांगावर तिची तुटली काकणे
शेवटच्या वार्तांनी अंधारताहेत डोळयांत उद्याची अंगणे.

✻

✻

ती आली क्षितिजावर
तेव्हा कुणीच नव्हते
फक्त तिचे डोळे उमलत होते
आणि त्यासाठी माझ्यात नवे जन्म.

✻

बागेतून सुकलेल्या फुलांची
वार्ता तिनं ऐकली.
परडी घेऊन काळजीने
ती बागेत आली.
बाळलेल्या फुलांनी नकार दिल्यावर
ती स्वतःशी फिरून आली.
थांबल्यावर तिला समजले
परडी फुलांनी गहिवरली आहे.
आता त्यातले एकेक वेचून
मनाची नावे ठेवताना ती
स्वतःच वाळलेली बाग होतीय
— तिकडे तिचे लक्षच नाही.

✻

✻

प्रणयभोर समुद्रगाणी
झुळझुळताहेत कधीपासून पायाशी.
भरून घेशील कळशी ?
ही तहान विझेल ?
हा चंद्र उरेल ?
बहकल्या जन्मांना किनारा लाभेल ?
... प्रणयभोर समुद्रगाणी.

*

या पहाडाच्या माथ्यावर कधीपासून
कर्जासारखे भुईकोट किल्ले
छातीत वेळू रुतावे, जन्मापासून
तसे उंच मीनार
युगांपासून मन पोखरीत जाणारी भुयारे.
पहाड कधीचाच शापित हाकेसारखा.
एक दिवस पहाड फोडून वेल उगवली.
थोडी उन्हे हसून आली
राघूंनी दरीतुन शीळ दिली
पहाडाच्या छातीवर वेल उगवली.
तेव्हापासून प्रत्येक पहाटेला सांगत फिरतो
पहाट फकीर, 'साजणबाई—सांगू म्या काई
डोळ्यात जाई कैशी उगवली
अंतरीची धून कशी जागवली.'
संपूर्ण गाण्यासाठी पहाड
आलोचन जागत बसलेला
वेलही कुरवाळता येत नाही छाती फोडणारी
जगवायची म्हणून त्याला.
त्याचे हात संध्येत बांधलेले
निद्रिस्त फकीरागत
एकेक फूल वेलीवर मावळलेले.

*

*

कुणी विचारले त्याचे कुशल आताशा
म्हणतो, लवकरच धूर दिसू लागेल
डोळे सज्ज ठेव.

✻

या निष्ठूर पारिजाताने सांजकळ्या धरल्यात.
ही वात' भोयांना ठाऊक आहे
तुझा मेणा ते या दाराशी थांबवणार नाहीत.
काय सांगू, सहन होत नाही
वाटेला अवेळी फूल येणे
एकाद्याच नक्षत्राचे वेडे खुणावणे
वृन्दावनातल्या दिव्याहाती मंजिऱ्यांवर करुणा होणे.
देहातून लोटून दिलेल्या लाटांची कफनी होणे
सहन होत नाही तुझे वेळी अवेळी मनात येणे.
काळीज उघडावे तसे तुझे मेण्यातून पाहणे
अशावेळी तुझे कुंकू टपटपेल अंगणात
कळ्यांना सवय नाही, त्यांचा ताठाही सक्त.
पुढच्या मुक्कामावर येतील सकाळचे वारे
जन्मगंधांची फुले घेऊन
पुरेसे दिले आहे तुझ्या वतीने त्यांनाही रक्त.

✻

✻

तिच्या कठोरपणावर अजून
माझा खरेच विश्वास नाही.
कालच तर तिने गुलमोहोराखाली
मेंदीची चवकशी चालवली होती.

✳

आत्ताच डोंगर धुक्यातून वर वर येतो आहे
कोवळी पावले लाल नक्षी... रान रान भरलेले
आभाळ शेवट-ताऱ्याशी निसटताना उखडलेले
आत्ताच रस्ता मनावरून रस्त्यावर आला आहे
कळस दिसत नसतो इथून बाभळीची फुले फुले
आत्ताच थवा पक्ष्यांचा माथ्यावरून उडणार आहे
जोडून दे तुझे गाणे आपण त्यावर गोंदलेले
आत्ताच तोड तुझे कुंपण स्वतःलाही सोलून घे
मग रक्त सांगेल तुला सगळेच फकीर इकडून गेले
आत्ताच धुके डोंगराला हळू हळू तोडणार आहे.

✳

✳

या काळ्याभोर कुंतल ओळी
टवटवीत जखमेतून पसरत जाणारे
गात्रागात्रातून कुंकुम
समोर एकटक तळ्याचा आरसा
गुलज़ार श्वासातून जगणाऱ्या
गुहामग्न गाण्याचा हलके कवडसा
माझ्या कवितेत विरहाला प्राण देणारे पक्षी
माझ्या आधी... माझ्या नंतर... झुलणारी फांदी
आत्ताच प्राणांनाही मृत्यूची फुट्ट पाहणारी नांदी.

❋

तूच जर...
दिले पेटवुनी अवघे अंबर
त्या डोंबावर धरीन मीही
सक्त कलेवर
घेईन म्हणतो प्रकाश भरुनी
हवाच तो तर सदा सभोती
प्राण चंद्रसा मऊ ओलसर.

तूच जर...
असे उभविले लाखेचे घर
या भिंतीवर गोंदुन घेईन चित्र अनावर
जळुनी गेले समजा घरकुल
उरेन मीही युगायुगातुनि
तुझ्या मनावर

तूच जर...
स्फोट घडविला दारी
कोसळता जन्माची सर
वेचुन घेईन तहानेस्तव जळलेले अक्षर
जरी धाडिले तूच मुळावर

❋

❋

पुरात उरल्या खडकावाणी
लाटा हाती देतो गाणी.

❋

प्रेयसीच्या विरहासारखा हा मरणश्रान्त काळोख
पावले गळाली मागेच संपून गेले वाळवंटात शोक
सावल्यांचे सुकुमार देह संगतीला
अशा स्वप्नांची अधु रांगोळी
किनारा तुडविताना जड पावलांखाली
नुकतीच मेली डोळ्यांची मासोळी.
उगाच आठवतोय् तिची तडफड
माझ्या प्रदीर्घ कोरड्या पात्रातून
आता आसवांच्या रडवेल्या डोळ्यांत उभी शंका
प्रिये, तू तर नव्हतीस ना गेली इकडून ?

❋

❋

आता कोठेही जातो तर आधीही
तू असतेस ... नंतरही.
नंतर मी कुठेही नसतो...कधीही...पूर्वीही.
ही तमाम अरण्ये झाकण्यासाठी
तुझा पदर पुरेल काय ?
राखेवरून पार होताना
माझे पाय उरतील काय ?
कलकलत जाणारा दुष्काळ पक्षी
गाण्यातून मागे राहील काय
सगळेच गारुडी भवती
आपल्या वाटांतून साधे जहर तरी
फेकणार काय ?
आपले हसू...आसू...आपण असू....नसू
या पृथ्वीवर चिमणासा फरक पडणार काय ?

प्राही ग्रंथ संग्रहालय ठाणे
22363
काव्य
2356
शाखा (स्थळ प्रत)

*

संन्यस्त प्रार्थनांसारखा तू
तिच्यास्तव कोवळा होऊन ये

देहावरी अंकुशाची घरे
फत्तराची फुले माथा झेलित ये

ओसाडीवरी वैशाख पेटे
पंखांतुनी अंतरा जाळीत ये

अंगणी घेशील छाती फोडुनी
तेव्हाही गागी सांडुन ये

या फणा नकाराच्या जुन्या
बेबंद आयुष्या दंशित ये

सूर्यास्त घेशि जरि पाठीशी
तिला पहाट–फूल होऊन ये

गुन्ह्याला टाचले आयुष्य ज्याचे
त्या फकीरा तुडवीत ये

घेशील भिक्षा झोळीत जेव्हा
तिच्या ओटी पाखरू घालून ये

पेटला वणवा आता अंतरी
गळा ओली वहान होऊन ये

तिच्या ओंजळीला ओंजळीत घेता
डोळे आपुले वळवुन घे.

*

झड लागे पानोपानी
कळ रुतली डोळाडोळी
पिळवटुनी झाल्या तारा
आतडे की ओठावरी

मजवरून धावल्या वाटा
एकही पण माझी नव्हती
कातरवेळी पदराने
कशि पेटत राहिल पणती
शेवटचे पाऊल निघता
विझुमती दिव्यांच्या ज्योती
तू निघून गेल्यावर गे
मन तोलते मरण उदासी.

ही कुण्या नभाची खिडकी
जन्माशी वैरीण झाली
ढग काळे आवर बाई
ती कधीच बरसून झाली.

❋

हा असा टेकडीवर उभा मी
निष्पर्ण.
हे गझलांच्या कळपांनो
तुम्ही असा दावा साधायला नको होता.
असेच ओढता काय,
तुम्ही एकेकटा गाठून आपापल्या कळपात ?
कसे शोभून दिसतात हे गजरे
तुमच्या अनादि हातात.
माझ्या दिशेने फेकाल त्यातला एक जरा
तो फक्त माझ्यावरच कोसळेल असे पहा.

❋

या भयदाट अरण्यात शिरलो तेव्हा
पायवाट आतल्या आत जळणाऱ्या दुःखासारखी
मोडून पडलेली.
माथ्यावरून ढगांची पुण्याई
अनोळखी होत/होत बरसण्यापर्यंत केविल झालेली
पक्ष्यांची फुटलेली लाट जरा पुढून
अंतःकरणात रक्तविहीन स्वरासारखी
मनावरून पांगलेली
आता दाटू लागलेल्या अंधारात दिसेनासा मी
कधीच दिसेनाशी तू आणि
पापणीही थोडी ओलावलेली.

❋

हरकत नसेल तर
तुझ्या मैफिलीतून उठून जाऊ काय ?

मला तुझे गाणे साहवत नाही
अंगभर वारा घेतलेले हे पडद्यांचे ससे
पाहवत नाहीत.

काळजांच्या यातनांसारखा हा काचांचा दिमाख
पेलवत नाही.

तुझ्या कपाळावरचे हे हजार पश्चातापांचे चंद्र
या मद्यात बुरणार नाहीत

मुख्य म्हणजे मी उठून गेल्याशिवाय
तू मैफलीत हसणार नाहीस.

तेथे पोचेन किंवा पोचणार नाही,
तू आता मात्र नित्य येथल्या खिंडीत.

जाताना तुझे सूर घेऊन जाईन माझ्या झोळीत.
झोळीतल्या शब्दांवर तुझी मुद्रा

उमटवीन म्हणतो. तेवढेच हाती आहे.
त्याशिवाय त्यांची नाणी होणार कशी ?
माझीही मैफल रंगणार कशी चंद्रास्ताशी ?

हरकत नसेल तर
तुझी मैफल सोबत घेऊन जाऊ काय ?

※

तू ज्या पहाडावरून आलीस उन्हे घेऊन
त्यालाच थोपटीत राहीन तू गेल्यावर
भैरवीच्या बोटांनी अंधार पेटवून

तुझे आर्त डोळे वणवा पेटवू शकतील
इथे बर्फगार स्मृतीत मला कोण वाचील ?

हृदयाची लक्तरे नेहमीच अधांतराला प्रिय असतात.
रात्रीहून काळोखे जन्म दयेसाठीही उरत नसतात.

मी प्रतीक्षाच खुडून टाकल्या,
माझ्यासवे तुझ्या वाटेवर.

काळीज रिते, तूही नाहीस एकाद्या सुराच्या
तुकडयाइतकी वाद्य थांबल्यावर

वाटांचा जन्म सवयीतून होत असेल
तर हीही तुला सवय होईल.

रडून हलकी झालीस सावरीच्या आठवणीत,
झुळुकीशिवाय हलून जाशील.

जेथे आभाळाला पाठ लावशील तेथेच
प्रार्थना हरवून सांज होशील
क्रूर म्हणण्याआधी खोल अंधार उतरू लागशील.

कुण्या पहाटेला सूर्य ढकलून फुटलेले समुद्र-शहारे
अंगभर थरथरून माळशील
एकदा अनवधानाने दिलेली गाणी
दिशांकडून मागत फिरशील.

नक्षत्रांसाठी पसरलेले हात
रित्याने केसांवरून फिरवून घेशील

अशी आतून ढासळताना
कालचे आभाळ पुन्हा भाकशील

अशा वेळी तू तुटशील... जुळशील
उरशील...नुरशील...असशील...नसशील
तुला कसे सांगू,
अगदी अगदी माझ्यासारखेच
सारे... सारे करशील !

*

*

चुकामुकीच्या झाडावर हे कावळे
किती आनंदात आहेत
पण तू अशी खिन्न का ?
कदाचित् माझं फूल झालंही असेल
एव्हाना टवटवीत— चुकामुकीचं, बिनचूक,
तुझ्या चेहऱ्याचं... सनातन

※

अशावेळी मला खरेच संगती लागत नाही
मी अपसूक होत असतो आदीम.
अंतराळातून पडणाऱ्या कोवळ्या बर्फासारख्या
आठवणीत माझे सारे संदर्भ असीम.
कोसळण आतल्या आत, सागांच्या जंगलात
वर्षाधारेत भिजणाऱ्या पंखहीन पक्ष्यासारखी.
संगती लागत नाही.

लांडग्यांच्या कळपात वाढणाऱ्या राजपुत्राला
परीच्या स्वप्नाची
खंदकात मान टाकणाऱ्या मित्राच्या
ओल्या काळजावरून तहान टिपणाऱ्या अमानुष डोळ्यांची
बेघर काफिल्यासाठी छपराछपरातून आभाळभर
कॅक्टससारख्या उगवल्या माणसांची
वेश्येच्या घरात खुळ्या पाळण्यावर चिंध्यांचे राघू
तशा असांस्कृतिक पावलांची.
आभाळाहून उदार तुझ्या बाहुंमधली
येथल्या टिचक्यांनी पिचून जाण्याची
नाही लागत संगती.

कसे छान कलम करता तुमचे बेसूर
नख लावून आदिवासी गळ्याला.
मायावी राक्षसांना कसे आप्तांचे आकार देता
कळीच्या स्वप्नातले राजपुत्र पहाटे पहाटे गारद करता.

प्राशू नये फटीतून सूर्य
जखमी होऊ नये चंद्राकडून
म्हणून वाढविता तटबंदी
सभोवार सारे पणाला लावून.
वर आक्रोश ठेवता पहारे
हुंदक्यांनी उमलू नये म्हणून

सामुदायिक हत्याकांडानंतर वहाणाऱ्या ओघळासारखा
रात्रीवर सांडलेला एकांत एकटा नसतो, तुझ्याशिवाय.
उसवून टाकते खेळण्यातल्या चिंध्यांसारखे आयुष्य
तुझ्या भेटी कालच्या जखमांवर अमृताची साय

अशी तुझी सावली, मागल्या पावली
काळोखाच्या दारा येतो
एकेक दीप मालवताना मीही
कसा मशाल होतो.

आताशा सावकाश आदीम होतोय
तुझ्याशिवाय...तुझ्यामुळे...तुझ्यापर्यंत
भोवताल फणा काढून आले तरी
नित्य तुझ्यातून मी माझा नितान्त

*

ओठावर बोट ठेवले तर
या चांदण्या कल्लोळ करतील
म्हणून ही खिडकीच बंद करून टाकली.

केसातून डोळे माळून घेतले तर
क्षितिजाला प्रकाशाची लहर येईल
म्हणून तावदानांना अर्धीच कथा दिली.

ज्यांच्या देठातच काळीज अडकून पडते
नंतरच्या आयुष्यात,
अभाविताला आलेली अशी कुशलाची फुले
दूर जाताना टवटवीत होत गेली.

आता कुठे मुळातून प्रवास सुरू झाल्याचे
आपण एकमेकांना सांगितले
आणि काळजीपूर्वक निरोपाची जखम गोंदविली.

*

*

किनारा सोडलेल्या
घायाळ जहाजासाठी
मी चाचपतोय समुद्र
कधीपासून. . .आणि पाणी ?
— तेही करीत नाही बेइमानी.

*

बुडताना जहाज संथ वर यावे
असा तुझा नावे हरवण्याचा अट्टाहास.
एका नावाच्या अस्तातून तू
पुन्हा नव्या प्रवाशासारखी
लख्ख उत्साही होतेस.
नावे बदलून तरी किती बदलशील ?
हरवलेल्या केसांसाठी
ओळखीचे गुलाब कितींदा मागशील ?
असे पुनःपुन्हांचे निर्भर हरवून जाणे
पाठीवर कोरलेले मृत्युर्लिपीतले उदास गाणे
कितीदा ?

बुडालेल्या जहाजातून उतरणारा
एकुलता एक प्रवासी माझ्या चेहऱ्याचा.
मी त्याला हात देतो
त्याला किनाऱ्यावर आणतो
तूंही खरंच बदलून ये ना,
तोवर मीही माझा निरोप घेतो
जसा जहाजाने घ्यावा बुडणाऱ्या क्षितिजाचा.

*

*

सकाळपासून काळे ढग
मनाशी समांतर
दूर टाचलेला सागर
लाटा लाटा गहिवर.

*

आभाळाचा सारखाच आधार
तुझ्या माझ्या माथ्यावर असताना
पहिल्या भिंती कुणी बांधल्या ?
कुणी घातली कुंपणे...पाखरांसाठी तारेची ?
कुणी ठेवली दारे...अधुनमधून सोय श्वासांची ?
आभाळाचा सारखाच आधार
नाकारताना त्यांनी धरले दोन ध्रुव
भिंतींना तुझ्या–माझ्या असावी दिशा म्हणून.

या दावेदार भिंतींतून मी मावत नाही
आणि आभाळ मला आपलं म्हणत नाही.
ओंजळीतून पडणारे तुझ्या–माझ्या क्षण
तहान होऊन हिंडताहेत अंतराळात
आपले गळे आवळून झालेत म्हणून तरी बरे
सगळीच उधळू नकोस आत्ताच
यात्रेसाठी असू दे ताजा कलम म्हणून
तुझ्या जायबंदी लखोट्यातली अक्षरे
त्याहून शेवटच्या निरोपाचे डोळे खरे.

डोळे...कधी पालणाचे
क्वचित प्रलयाचे, बहुधा पाण्याचे
उद्‌ध्वस्त तळावर चुकलेले
फाटक्या झोळ्यांचे मुसाफीर डोळे.
एकाकी आकांतावर पांघरलेले चांदणे
भैरवीनंतर उलटलेल्या जखमी मैफलीत गा।
समाधीच्या पावलांना फुटलेली फुले
कोवळ्या सावल्यांना दचकणारे तळे

आता सांडतील तेवढी गाणी माझी
एवढीच डोळ्यांना अट.

अशावेळी तो नेहमी एकटा निघतो.
भिंतींचा आपल्या आधार सोडून
प्रस्थानापूर्वी तो बेचिराख वाळवंटात
आपले हृदय ठेवतो पुरून
येताना फुले लागतील या आशेने.
त्याच्या प्रत्येक पावलागणिक
समोरच्या भिंतीची भुते झाली.
कर्ण-रथासारखी पावलेही खचत गेली.
आपले हात टांगून ठेवतो सुरूच्या शेंड्यांना
उद्या तिच्यासाठी प्रार्थना होतील म्हणून.
भिंती आभाळ-बंद झाल्यावर
त्याला खूपच खूप आठवत गेले.
आपण नसल्याचेही आठवले !

*

*

दिवसभर हिरवे रान वाऱ्याबरोबर डहळून गेले
काळ्या ढगांनी सावल्यांतून सहज आशीर्वाद दिले
जरा कुठे दुःख गळा आले, शब्दच गळून पडले
अजून ठिणगी झडलीच नव्हती मात्र वणवे पेटत गेले.

✻

या जागेवर उभे राहण्याआधी
जमिनीशी नाते नीट जुळवून घ्यावे.
शक्यतर पायाभरणीला त्वचा सोलून घ्यावी.

श्वासांच्या मिळणीची हवा
बाहेरच्या झुळुकीनेही डहुळते
पायापासून हादरतात पुढची घरे, ठाऊक असावे.

इमानाचा काडी कचरा वेचून आणताना
ठेवावी मजबूत डोळ्यांची दारे.
निखळण्यासाठीच असतात बांधायच्या संदर्भ-भिंती

छप्पर आपण नाकारले मनापासून
की आभाळही आपोआप जवळ येते !

अशा घरातून कापूर जळणार नसतो कधी
जन्मवासात जायबंदी मन न्हात राहाते नुसते.

✻

✻

कसे हे चालत येतात क्षण अंगावर
हव्या-नकोच्या तालांनी लाटांलाटांवर
उरी फुटून जर कधी माती व्हाळ
ठेचाळू नये कुणी म्हणून फक्त व्हा मशाल.

*

त्या रात्री चंद्र मावळल्यावर
प्रश्नांचे कोंभ मारेकऱ्यांच्या हातांसारखे
सरसरून उठले.

प्रश्न माझ्या झेलण्याच्या सामर्थ्याचा नाही
तुझ्या अंधुकही न शहारण्याचा आहे.
स्वप्ने नक्षत्राधीन करून आभाळ नाकारण्याचा नाही,
मोडल्या घरट्यावर निवांत पक्ष्याओठी
तुझेच गाणे नित्य का, याचा आहे.
अंतराळ जेव्हा जमिनीला शरण येते
तेव्हा प्रश्न अंतर्धान झाल्यासारखे दिसतीलही,
चंद्रपीडेने आयुष्याला हाक दिल्यावर
प्रतिसादेत काहूर उठवायचं असतं काय,
प्रश्न याचा आहे...

सगळ्या सकाळी तुझ्या आहेत. तुझ्याच असोत.
ओच्यात ताजी फुले घेऊन तू होशीलही स्वस्थ
ओळीतून विश्वासाचा गंध हरवलेल्या अक्षरासारखा
मी गर्दीतून जाईन, माझ्याच काठाकाठाने
मृत्यूच्या भयाने कापणाऱ्या शहरासारखा
...कधीच उद्ध्वस्त.

❋

या क्षणी निर्गंध रेताड ओस मन
रुखी चोच तुझी. दिशा पंखातच वणवण

❋

प्रियेचं कुंकू पंखरावं
पदरावर इथे-तिथे
किंचित्, झाकलेल्या पावलांशी
तशी फुलं गळतीची पळस पायांशी
या जंगलातून निघतो
चुकवीत ती केशरी अंगणे
फक्त अंगावर घेतो काही
भर मध्यान्ही पळस-उन्हे
घेतो काळजी,
फुलू नये पळस पुन्हा अंगांगे
चुकीच्या पावलातून... कुंकवाने

*

गाफील ठेवू नये कधी
जन्म आपल्या तळहातात
नाहीतर सांगावी लागते आत्महत्या
शांतपणे रोज सुन्न आभाळात

*

शब्द कधीच नसतात
आपले... आपल्यासाठी
जेव्हा घट्ट उभे आपण
निवडलेल्या दुःखांकाठी

रात्र काळी पावसाळी कोठे गर्जती घनावळी
पंख–पाहुणी जखम माझी सर्व रान जाळी

कोठल्या दिशेने आली चिंब हाक कानी
कुणा शोधी डोळे खुळे तहानल्या पानी

आली कशी चिऱ्यातुन ही पिंपळाची मुळे
झाडुनी काळोख ही दिवली कुणास्तव जळे.

हळुवार ढळती धरटी चिखल आठवांचा
गेले उडोनी रंग मन दाही दिशा काचा

कोणत्या सागरी बुडाले नक्षत्र ते सावळे
कशी चुकामुक वाटेची इथे जन्माशी खेळे.

शकुन पक्षी नाही थांबला अस्ता गेले गाव
लागली तुमची वस्ती पण मला न माझा ठाव.

मी घातलेला प्रत्येक प्रश्न
ती झेलत गेल्याचे समजले
प्रत्येक बहरत्या फुलाच्या हृदयातून
...फांदीफांदीवर
उत्तरासाठी थांबलो तेव्हा समजले
सगळ्या कोमेजल्या फुलांचा
एकच रंग असतो.

*

गावकऱ्यांना ही वार्ता अजूनही ठाऊक नाही.
ओळखू येण्यासारखी एकही खूण उरली नाही.
ज्वाला पक्षपाती नसतात
म्हणून त्यांचे हवाले बाद झाले.
राखेचे इमले, एकूणच आयुष्यासारखे
हळुहळू ढासळत राहिले.

गिधाडे नव्हती, गणगोत नव्हते
खरे तर इतके सुखी सरण ओळखीसाठी पुरे होते.
मी त्यांना बरगड्यांवर केसांचे ठसे
दाखविणार होतो.
त्यांनी तिलाही मग जिवंत सोडले नसते
असा बेइमान होणार नव्हतो.

गावकऱ्यांना ही वार्ता अजूनही ठाऊक नाही.
आणि तिला ?—तिला तर नाहीच नाही.

*

*

अंगणीच्या बाळरोपांनो
असे अंगभर माझ्यासाठी
सांत्वनाचे डोलू नका
—तिचा निर्णय अंतिम आहे.

*

झाडांनी ठेवावे कानी हात अंधाराने गळा ध्यावे धुके
अशी का वाताहत ?

गोठून गेलेल्या मधल्या शब्दांवरून हे कोण येते
आतून वाहत वाहत ?

दूरवरून येणाऱ्या दिव्याला होऊ नयेच काय
कुणी कधी किनारा ?

अनोळखी नात्याने सोडू नये का प्रवाही आपुल्याच
जखमेची एक धारा ?

कसे गळून पडतात मोहर, कशी विरकटतात घरटी
सावरू नये का वाटेवर ?

वणव्यात भयाने उडाल्या पक्ष्यांना या सांजवेळी
अता कुणाची पाखर ?

हातच हातातून गळाल्यावर असहाय गळा थांबलेले
जळून गेलेले गाणे
किती करुण दुरून डोळाभर नुसते पहाणे, अपुल्याच
नगरीचे बुडून जाणे.

*

*

एका अकल्पिताच्या चुकामुकीसाठी
इवल्या देहात आजन्म मरणदाटी.

✻

वितळलेल्या यातनांचा पाझरता प्रकाश
स्मशानावरून येताना गाणे गहाण ठेवून
आलेला पक्ष्यांचा थवा
काळीकुट्ट भूक त्यांच्या चोचींतून परजलेली
गढूळ सर्वत्र हवा
निष्पर्ण फांद्यांमधून अनाहूत उगवलेल्य
सांजेतून स्वागतशील क्रूस.
मी धावत गेलो या नगराकडे
रक्त ओकणाऱ्या शेतकऱ्यासारखा
अंत्य-दर्शनाला उत्सुक माझ्या खाचात
क्रूसात अडकलेला चेहरा साजण पारखा.
आता रात्रीशी रेलून सावकाश रवंथ करतो
'दोस्तहो, मी तुमच्यात कधी होतो ?'

✻

✻

अशा कवितेकाठी तू अरक्षिता
मातीने अंधार धरलेल्या मुळ्यांचा
तू सर्वदाही घोष.
उद्यांच्या तांबडया फुलांतून
दिशादूर घनघोर काहूर वादळताना
पहाडावर आदळलेला पोरका हुंदका.
गळ्याला लागलेली एवढी कविता सोडविताना
दाराशी सज्ज तुझ्याच पायांच्या... या पादुका.

✻

शैलीदार कहाण्यांचे शेवट मनोमन उगवतात
विदेशी निघाल्या थव्यांसारखे पक्ष्यांच्या आभासात
थटून असतात आयुष्य नावाच्या अनर्थवाही शोकेसेस्मधून
मी नाकारीत असतो त्यांना कफल्लक गिऱ्हाईकासारखा
माझ्या हाती आरंभालाच भेटलेला शेवट असतो घट्ट आवळून.

आता आपण डोंगर चढू या
जेथून आपला कडेलोट झाला.
निभावून नेण्यासाठी पुन्हा वेचू या
वाळल्या गवतातून काळवंडल्या शपथा
तळव्यांच्या सुरकुत्यांतून तुझी माझी गाथा
माझ्या प्रत्येक प्रश्नावर तुझे अबोल होणे
तू? चंद्रास्ताशी थांबलेले चेतोहर गाणे.

नुकतेच मावळू लागलेले पठार उगवतील एकच लाही
वेळी अवेळी डोळे ओले करून निघून गेल्या दिशा दाही
रंगात आल्या खेळाचा ध्रुव आठवत नसतो, बरे असते
प्रत्येक कहाणीला शेवट असतो हेही काय थोडे नसते?
कहाणीच्या गाभ्याने स्वतःला सोलून घेणे किती असह्य
तुझे सारे परत करताना हे आठवही अपरिहार्य
किती तुझा नितळ हात आतले पाखरू दिसू येते
खव्याळ काळ्या केसांमधून कहाणीला हसू येते.
या अधीर अधरावरून माझे नाव वाळवून घेतो
तके व्याकुळ डोळे त्यात मी बोलुन चिंब होतो.
माझ्या दिशेचे तुझे पाऊल जरा थोडे थांबवशील?
हातही आयतेच ओले त्यांनी मेंदी रंगवू देशील?
तुझे हात तुला देईन सोडवतानाही पाखर घालू?
फक्त डोळे विसरताना छातीत पूर कसे झेलू?

✻

*

बुचांची फुले घळावीत
तसे स्वप्नांच्या सरी ढाळणारे तुझे डोळे
फडफडावेत हजार राघू
पृष्ठभागावर तळ्याच्या...काळीज-मुद्रेचे डोळे.

भविष्याच्या नकार-लयीत
सम साधणारे अंधार गाणे असे डोळे
तहानेच्या आदि-पर्वालाच
निखारे पापण्यात घेणारे स्वतःसाठी डोळे.

माझ्या स्वप्नांना तुझ्या दिशेने यायला
खूप उशीर झाला काय ?
काहीच कसे आठवत नाही की
माझीही ठार कोळशांची बुबुळे ?

*

वहाणाऱ्या नदीत संध्याकाळ उतरते
ही वेळ तिच्या कुशलाची नसते.
नदी । तिचे अंग-प्रत्यंग
डोह । माझाही निःसंग.

अशी कहाणी नदीला काठावरून सांगू नये
ती पुन्हा दूर किनाऱ्याशी लावते.

नदीची रेषा पहाटेवर उमटली की
तिच्या मनातले पक्षीही
सहज अक्षरे होतात
डोळ्यांच्या ओल्या वाटेने.

चांदण्यात ती ओल्या दुःखासारखी
चंद्रच वाहून नेते
अशावेळी नदीचा हात तरी किती पुरणार ?

कोसळणाऱ्या पावसात
आभाळालाही नदी व्हायचा मोह होतो.
तर तुझे काय ?

कधीतरी नदी उगमाशीच थांबते
आयुष्य अडकून पडावे कुठे तरी तशी
मग आपल्यालाच पूर येत राहातात
कोरड्या पात्रांचे.

सांत्वनाच्या तळव्यासारखी
नदी सहज माथ्यावरून घ्यावी.
अशावेळी तळ लागो–न लागो.

*

आता आभाळ मनासारखे भरून आलेले
मनच पिसारा झालेले.
रात्र तडकली की
तिच्या नृत्याला सुरुवात होणार.
आकाशाचे अंधाराने ऊर भरून येईल.
चार-दोन चांदण्या आसवे होतील.
आवळ्यासारखा चंद्र क्षितिजात हिसुसून गर्भारेल
तेव्हा तीही पायात वीज बांधून घेईल.
देठ तुटावे जुईचे इतके हलक्याने तिचे पदन्यास.
आता आठवणीसाठी काळीजभर फुले सांधीत बसतो.
तिची बेभान नग्नता
आणि तुमच्या टाळ्यांचा कडकडाट
दरम्यान फक्त एक कहाणी असल्याचे
विसरू नका.
ती संपून बराच काळ लोटला.
सोयीसाठी केवळ
तिचे नृत्य आठवीत जात्रे.
तिची पावले थांबतील कधीतरी
म्हणून ओंजळ घेऊन उभा.
हे फूट-लाइटस् आणि स्पॉटस्
आता विझवून टाका
हे कल्लोळ माझ्या दिशेने आणू नका.
तुमच्यात मी असताना हे सारे कशाला.
आता ओल्या पापण्यांनी
तिचे जळते नर्तन
आणि माझेही प्राक्तन.

✳

गालांवर थांबलेले थरकते चंद्र
आता थेंबा थेंबाने किती वेळ झेलू ?
कुण्यादारी झोळी फाटली की
संपत असतो भिकारी.
जन्माच्या अशा काळोखाला
किती टाके घालू ?
दरडीवरून सुटलेल्या घुंगुराची हत्या
पायाखाली जळताना कसा विझवू ?
ज्या जन्मतील कथा त्यांना
कोणत्या देशी, कोणत्या लिपीत
कुणासाठी लिहू ?

*

संन्याशाच्या पूर्वायुष्यासारखे
हे उद्विग्न पडाव भग्न.
उत्तरायुष्याची खूण तसा
निमूट ध्वज जीर्ण.
पेटलेल्या वणव्यात सारलेल्या
जळितासारख्या व्यथार्त वाटा

...हा चौथरा मी साफसूफ करून घेतो.
पुढचे आभाळ छातीवर घेण्याआधी
हा किनारा सोडतो.
तुमचे पाय समर्थ आहेतच
तरंगून आली जर गाथा.

क्षमा करा महंतहो, कफनी टाकून
गर्द झाड होण्याच्या गुन्ह्यासाठी
डोळाभर पाहू दे मेणा तिचा
तुमच्यातून नुकतीच आलीय वार्ता.

*

चांदण्यात भुकेल्या कुत्र्यांच्या जिभांनी
सावल्या लपालपा जमिनी गोंजारतात.

मायेचे कूळ नाही कळत म्हणून
कधी कळ्यांना जन्माआधीच गाठतात.

हर्षांची लाख फुले होत सावल्या
हरवल्या सखीचे हृदय होतात.

उन्हाला टाचून बेवारशी सावल्या
काळजावर गहिरे रक्त होतात.

पानगळींचे आसू ढाळून सावल्या
दाट आठवणीत वेड्यापिशा होतात.

जन्म उन्हात वाळवल्यावर सावल्या
बेफिकीर मौनातली थडगी होतात.

हळव्या खेळातल्या पदरात सावल
माथ्यावर आशेचे तळवे होतात.

थकण्यात पाखर
वियोगात हंबर
व्याकुळ संध्येत
डोळां अंबर सावल्या अशी रूपे घेतात.

सावल्या वाढतात, वेढतात...अंगावर गाण्यांचे
मणी सांडून फकीरागत मावळतात.

अशा सावल्या सरकत सरकत
आयुष्यावरून निघून जातात.

कधी सावल्यांखालूनच बघता बघता
आयुष्ये चालत येतात.

कधीतरी असे होते
एखादीच सावली एखाद्या मुक्कामावर
सगळ्या सावल्यांवर सावली धरते.
मित्र हो, तिची जातकुळी कुणी विचारीत नसतात.

*

तुझ्या शब्दांचे लहडून आलेले झाड
आताशा पहातो तेव्हा धास्तावून ऐकतो
माथ्यावरच्या मनचुकव्या पक्ष्याची
काहूर-बोली.

‘ शेवटी आसवे म्हणजे काय ? कशासाठी ? ’
माझ्या प्रश्नाला तू दिलेले
शब्दाशिवाय उत्तर
मी अलगद झेलले तळहातावर.

तेव्हापासून माझे शब्दच आटून गेले
आणि निखळ पाणीसुद्धा
तुझ्या उष्ण उत्तरातले.

तिच्या मैत्रिणीने तिला स्नेहाने घरी आणले.
सात दालनांतून राजकन्येसारखे फिरवीत नेले

एका जन्मांधळ्या भुयाराशी
दूरचा झरोका खुणेने दाखवला
तिथे तिचा चंद्र होता कधीच कोमेजला

सजवलेल्या भिंतींवर श्वापदांची मुंडकी
गडाच्या जंगलातून तोडून आणलेल्या
पिसाट चेहऱ्यांची... खूप नकोशा ओळखीची
भिंतींवर पूर्वजांच्या तसबिरी कालपावेतो.

तिच्या चितारलेल्या चित्रांना तेथे जागा नव्हती.
पापण्या पालवण्यासाठी फक्त अडगळीची खोली
तिच्याहून, तिनेच ठेवलेली मुद्दाम रिती.

हुंदक्यांच्या कळ्यांनी विणलेला अंधार-पडदा
हलकेच दूर करीत राजकन्येला काही सांगितले.
वर खांदा थोपटीत तिचे शहारे थोपवले.

पुढच्या दालनाकडे निघाली तेव्हा
राजकन्येने डोळाभर पाहून घेतले
बाजूच्या व्हरांडयात एक पक्षी पिंजऱ्यात फडफडल
पदरावर आपलेच चित्र पाहून थोडा कळवळला.

सारी दालने संपली तेव्हा
तिचेही विश्व थांबलेले दिसले.
राजकन्येला टाळी देऊन सांगितले तिने
अशीच व्हायची असतात पिसलेली .

तिचा हात हाती घट्ट घेत मैत्रीण म्हणाली,
" ठेवशील ना ओळख, नाहीतरी चार मेंदीची
माझी फुले तुझ्याही हाती आहेत आली. "

पायऱ्या उतरताना राजकन्येने वळून वळून पाहिले
तिचे-म्हणून बांधलेले घर पेटताना दिसले.
थकत थकत एक हाक राख होत दूर विझली
राजकन्येच्या तळहाती जळती कहाणी ठेवून गेली

*

आता हा दुखियारी स्वप्नांचा कोलाज्
जन्म-दालनात मांडून ठेवलाय्
ऊर कापणाऱ्या करकरीत प्रकाशात

※

माझ्या मनात काही नाही
फक्त एक वादळ-हात
सदा झेपावे चंद्र-दिशात

माझ्या मनात काही नाही
साचलेले थोडे व्यथाजळ
उरल्या जन्मा न्हाउ घालत.

माझ्या मनात काही नाही
गत-जन्मांचे उध्वस्त तळ
डोहाकाठी वाटुलीला बळ

माझ्या मनात काही नाही
आभाळ-वेलीचे गाणारे फूल
म्हणतात चंद्र : रंगलेली हूल

माझ्या मनात काही नाही
एक जळणारे फक्त मन
ते सुद्धा माझे नाही
माझ्या मनात काहीच नाही.

*

तुझी निमंत्रणे पावलांत ये जशी कोवळी उन्हे
घेऊन ग्रीष्म हा निघालो चंदनाच्या दिशेने

कोण असतो सूत्रधारी यातनांच्या हाटातला
सारे पांगती पाहुनी, मी आज फार स्वस्तातला
वाऱ्यावरी दिल्या हाका बुडाले गाव कोणत्या तमी
बरा अंधार अंगावरी शोधितो माझ्या तळाशीच मी.

तुलाच नभा रे प्रथम कहाणी आकांतुन दिधली
सांज फेकुनी परत ने मज तुझ्याच छत्राखाली.

※

आता तू मागे वळून पाहू नकोस.
इतके पुढे आल्यावर
वाटांचा विस्तारही कक्षा सोडतो.

एव्हाना आपल्या वाटेवर आपण असत नाही.
दिव्यांच्या भक्क प्रकाशात
ठिणगीचा प्रारंभही आठवेनासा होतो.

इतका उजेड...इतक्या वाटा
इतके हात...इतक्या दिशा
उत्साहाचे काजळ रेखून
अनोळखी मुद्रेची अथांग निराशा

पाठ फिरवलेल्या आयुष्यात
तू नाममात्र कोसच्या कोस...
निघालीस तेव्हाची असणार नाहीस,
म्हणून म्हणतो, मागे वळून पाहू नकोस.

※

✻

हे देहभर खेळणारे दुःखसागर
धरतीच्या आशेने
किती काळ झेलू?
बुडून जाईपर्यंत प्राण
तळाला साथ देत नाहीत.
तुटल्या शीडासारख्या आठवणीतून
खरे तर काहीच साधत नाही.
तुझे हे हटवादी जन्मकिनारे
माझ्या दिशेने सोडतेस ?
मग कळून येईल कदाचित
मागे आपले काही...काही उरत नाही.

✻

हा धुनी धगवीत एकांत जाळणारा
कुणी फकीर.
वाहून आणतो तो आपल्या झोळीत
याच्या त्याच्या खांद्यांवरून
प्रवासाचे शीण, पायांखालचे काटे
सांडत राहाणारे काही डोळयांच्या वाटे.

मग बसतो आलोचन एकेक जाळीत ... जळत.
झोळी रिती झाल्यावर पहाटेला जाग येते.
मग तो रुद्राक्ष तोडतो.
कमंडलू फेकतो. कुबडी मोडून खडावा जाळतो.
किरणे अंगावर येण्याआधी
अंगावरची राखही झाडतो.
असा संपूर्ण तुटत तुटत पुन्हा निघतो
याच्या त्याच्याकडे,
धुनीत जळणारा एकांत दिवसावर फेकून
फकीरागत...असा कुणी फकीर.

✻

हे दिवस कसे रे देहभर कर्पूर-ज्योती
या रात्री खुळ्या मला देहान्त मालविती.

✻

झाडांनो,
तुमच्या काळजात उन्मळून आलं
तर तुमची मुळं मातीतून
कासावीस होतात काय ?
कोवळ्या फांद्यांची फूल–ओंजळ
अंगावरच वाळेल म्हणून
पक्ष्यांचा आधार कधी नाकारता काय ?
आभाळाच्या वळचणीला एखादा ढग
तुमच्या वेड्या डोळ्यांचा दिलासा म्हणून
तोलता काय ?
तुमच्या इतकेच तुमच्यासाठी एखादे झाड
पिसाटले असेल
तर त्याची हमी या जन्मी एकमेकांना देता काय ?
झाडांनो......

*

अशी पुरातून ओंजळ भरून घेतली
म्हणून नदीचं काळीज कळतच असं नाही
चार नक्षत्रांच्या खड्यांवर जीव टांगला
म्हणून आभाळ पाठीशी उभं राहातंच असं नाही.
पांखरांचा पंचम फांद्यांतून थरथरला
म्हणून झाडांची आत्महत्या समजेल असं नाही
मुठीतून पाखरू मरणापर्यंत नेताना
आक्रोश वळणावर समंध होणार नव्हता असं नाही
भरतीच्या लाटेने आयुष्यावर सांडून आलीस.
म्हणून पावलांना ओहोटी सांगितलीच नव्हती असं नाही
आपल्या भेटीत आभाळाला जमीन टाचलेली दूर
एवढा आधारही पुरेसा नव्हताच असं नाही.

*

हे प्रचंड अविनाशी घंटानाद
घुमटातून मस्तकापर्यंत.
या उत्तुंग सर्वभक्षी लाटा
क्षितिजापासून त्वचेपर्यंत
शोधतोय् या वस्तीत
उद्याच्या बातमीतली प्रार्थना
प्राक्तनांच्या थारोळ्यात कलेवर झालेली.

*

ती म्हणते तिच्या कंठात एक वीज नित्य होती
गर्दीत न बोलणारी माणसे मला आवडतात
एवढ्याच तिच्या-माझ्यातला दुव्यावर
पुढे पेटत गेल्या काही ज्योती.

अबोलाचे फूल देठापासून हलवावे
हा माझा आणखी एक छंद
तिचा कंठ जागला तेव्हा समजले
तिने स्वतःच केली होती सारी कवाडे बंद.

बंद दारावर थाप देण्याचा माझ्या हातांनाही जन्मसोस
माणूस आतून रक्ताळल्यावर साक्षीचे आसू
कोरड्या पात्रांना नाखुषीचे पाझर तसे
आताही तिचे डोळे कुठे ओले कुठे ओस.

मौनातले शहाणपण मी अदबीने तिच्याभवती
शिंपून टाकले.
तिथेही हरवले तिने मला.
उत्तरात फक्त अपुले डोळे वळवून घेतले.
म्हणाली, मला माणसांची भीती वाटते.
त्यांच्या दुःखांची त्यांच्या शब्दरूप देणाऱ्या
अमानुष समजुतदारपणाची.
अशावेळी कंठ एक अकाल वाळवंट होते,
अरे, मृगजळेही पाहू शकत नाही त्यात तुमची
थांबलेली वेदना जळजळत आली माझ्या कंठापर्यंत.
तेव्हापासून आता मनावर येणारा प्रत्येक शब्द राखेचा
अशावेळी काय करावे, आपणही न व्हावे जर गर्दीचा.

REFBK-0022363
REFBK-0022363

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22363
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

*

दरीतून वर वर येणारे हे धुके
सर्वांगी फुटून ओल्या हाकेसारखे
मृत्युच्या महाजांभईसारखे आभाळ
आता फक्त हाताशी...आयुष्यासारखे.

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ४ | मत्रीण | मैत्रीण |
| ५ | काळीजे | काळीज |
| ६ | वखुरलेले | विखुरलेले |
| ६ | निर्मीही | निर्मोही |
| १० | कमंडलकडे | कमंडलुकडे |
| १२ | हाताला | हातातला |
| १५ | चादण्याने | चांदण्याने |
| १९ | वाळलेल्या | वाळलेल्या |
| २२ | उखडलेले | जखडलेले |
| ३१ | आरवणीत | आठवणीत |
| ३५ | गा | गाणे |
| ४३ | विरकटतात | विस्कटतात |
| ५१ | थकण्यात | थकव्यात |
| ५३ | गदाऱ्या | गर्दीच्या |
| ५४ | फडफडल | फडफडला |